# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in


गो.वि./म.वि.वि. वि./ 705/2023 दिनांक: 26/05/2023

अत्यंत महत्वाचे/

## परिपत्रक

विषय :—महाविद्यालयातील अध्यापकांच्या करिअर ॲडव्हान्समेंट स्किम अंतर्गत (कॅस) प्रस्ताव सादर करण्याबाबत.

संदर्भ :— विद्यापीठाचे पत्र क्रमांक गों. वि./म. वि. वि. वि./२११४ दिनांक २५/०७/२०२२

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते कि, संदर्भीय परिपत्रकान्वये महाविद्यालयातील अध्यापकांचे करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) बाबतची प्रकरणे महाविद्यालयांकडुन विनाविलंब निकाली काढण्याबाबत सुचित केलेले आहे. तथापी महाविद्यालयातील अध्यापकांचे करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) अंतर्गत स्थाननिश्चितीबाबत महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर तात्काळ कार्यवाही घेऊन सदर प्रस्ताव विद्यापीठात सादर करावा. जेणेकरुन विद्यापीठाकडुन नियमानुसार समिती गठीत करण्याबाबतची कार्यवाही घेणे सोईचे होईल.

जे महाविद्यालय अध्यापकांच्या प्रलंबित करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) बाबत स्थाननिश्चिती समिती गठीत करण्याबाबतचे प्रस्ताव विद्यापीठात सादर करणार नाही अशा महाविद्यालयांवर/संस्थेवर विद्यापीठाकडुन तसेच शासनाकडुन कार्यवाही झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेचे अध्यक्ष/सचिव व प्राचार्य यांची राहिल याची नोंद घ्यावी.

मा. प्र—कुलगुरु यांच्या आदेशानुसार

( देवेंद्र एम. झाडे )
उपकुलसचिव (प्र)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी:—

१. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र—कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.